महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २९/१०/२००९

मा.स्थायी समिती सभा
सभा सुचना क्र.१३ दिनांक २६/१०/२००९
सभा क्रमांक २ दिनांक ४/११/२००९

ठाणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक ४/११/२००९ रोजी सकाळी ११.३० वा.कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृहात सभा सुचना क्र.१३ दिनांक २६/१०/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेतील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.पांडुरंग गोविंद पाटील | सभापती |
| २. | श्री.राजन नारायण किणे | सदस्य |
| ३. | श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे | सदस्य |
| ४. | श्री.सुधीर विष्णु कोकाटे | सदस्य |
| ५. | श्री.सुभाष आत्माराम खारकर | सदस्य |
| ६. | सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे | सदस्या |
| ७. | श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के | सदस्य |
| ८. | श्रीमती सुरेखा सुरेख खातु | सदस्या |
| ९. | सौ.कविता सुरेश पाटील | सदस्या |
| १०. | श्री.नजीब सुलेमान मुन्ना | सदस्य |
| ११. | श्री.दिनेश दाजी कांबळे | सदस्य |
| १२. | श्री.यासीन आयुब कुरेशी | सदस्य |

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. चंद्रगुप्त सिताराम घाग | सभापती |
| २. | श्री. भैय्यासाहेब (नागसेन)गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ३. | श्री.सुधाकर वामन चव्हाण | सदस्य |
| ४. | सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्या |

<u>मा. महापालिका सचिव :</u>

आजच्या सभेला सभापती उपस्थित नाहीत. तरी आज सभागृहामध्ये उपस्थित असलेल्या सदस्यांमधून एका सदस्याची सदर सभेसाठी सभापती नियुक्ती करण्यांत यावेत.

<u>श्री. दिलीप चंद्रकांत बारटक्के :</u>

आजच्या सभेसाठी जेष्ठ सदस्य श्री. पांडुरंग पाटील यांनी सभापती पदी विराजमान व्हावे अशी मी सुचना मांडत आहे.

<u>श्री. नजिब मुल्ला :</u>

सन्मा. सदस्य श्री. दिलीप बारटक्के यांनी जी सुचना मांडली आहे. त्याला मी अनुमोदन देत आहे. जेष्ठ सदस्य श्री. पांडुरंग पाटील यांनी सभापती पदी विराजमान व्हावे.

( जेष्ठ सदस्य श्री. पांडुरंग पाटील हे सभापती पदी आसनस्थ होतात. )

मा. महापालिका सचिव सभेस सुरुवात करुन विषयपत्रिका वाचून दाखवितात.

<u>श्री. दिलीप चंद्रकांत बारटक्के :</u>

सभापती महोदय, विषयपत्रिका सुरु करण्यापूर्वी एक महत्वाचा विषय आहे. यावर्षी पाऊस कमी पडल्यामुळे आपल्याकडील पाण्याचा जो साठा आहे तो कमी आहे याची सर्वांना कल्पना आहे. तरी आहे त्या पाण्याचे नियोजन कसे करणार याबाबत प्रशासनामार्फत निवेदन करण्यांत यावे.

<u>श्री. अर्जुन अहीरे, कार्यकारी अभियंता :</u>

मा. सभापती महोदय, ठाणे शहराला आपल्याला दोन स्त्रोतांकडून पाणीपुरवठा होतो. आपल्या स्वतःच्या योजनेत भातसा धरणामध्ये ७५ टक्के पाणीपुरवठा असल्याने, तेथे इरीगेशन विभागाने १० टक्के पाणी कपात लागु केली आहे. तरी दररोज १० टक्के पाणी कमी उचलायचे असे प्रशासनाचे धोरण आहे. तसेच स्टेम प्राधिकरण व एमआयडीसी कडून जे उल्हास नदीतून पाणी उचलले जाते त्यावर पाटबंधारे खात्याने २० टक्के पाणी कपात लागु केली आहे.यासंदर्भात स्टेम प्राधिकरणाने पत्र दिलेले आहे की, दर शुक्रवारी ते ठाणे शहराचा २४ तास पाणीपुरवठा बंद करणार आहेत. दररोज दोन तास पाणीपुरवठा इतर सहा दिवशी त्यांच्याकडून कमी होणार आहे. असे एकूण ३६ तास पाणीपुरवठा कमी होणार आहे. २९ तारखेला जी सभा घेतली होती त्यावेळी मीरा-भाईंदर, भिवंडी आणि ठाणे महापालिकेने त्यांना विनंती केली होती की, २४ तासाच्यावर आमच्याकडे कोठेही शट-डाऊन नको. २४ तासाचा शटडाऊन येत्या शुक्रवार पासुन लागु झालेला आहे. यासंदर्भात मा. महापौरांनी उद्या सकाळी ११.३० वा. बैठक आयोजित केली आहे त्यावेळी आम्ही याबाबत सविस्तर अहवाल देणार आहोत.

<u>श्री. हणमंत जगदाळे :</u>

सभापती महोदय,२४ तास असो किंवा २ तास असो यामुळे कोणत्या भागात कशाप्रकारे इफेक्ट होणार आहे. कारण ज्या-ज्यावेळी पाण्याचा प्रश्न निर्माण होतो त्या-त्यावेळी जो उंचावरचा भाग आहे तेथे प्रथम इफेक्ट निर्माण होतो. म्हणजे प्रभागनिहाय काय काय परिणाम होणार आहे याबाबत देखिल उद्याच्या सभेमध्ये चर्चा करा. म्हणजे काहीतरी उपाययोजना करता येईल.

श्री. नजीब मुल्ला :

सभापती महोदय, मुंब्रा - कौसा भागात आधीच पाण्याचा दाब कमी आहे त्यात पाणी कपात झाल्यानंतर कांय परीणाम होणार ? सद्य परीस्थितीत किती एम.एल.डी. पाणीपुरवठा होत आहे याबाबत माहिती देण्यांत यावी. संबंधित अधिकारी आता उपस्थित नसेलतर पुढील सभेला उत्तर देण्यांत यावे.

सौ. कविता पाटील :

सभापती महोदय, मागील सभेला प्रश्न विचारला होता, त्यावेळी उत्तर देण्यांत आले की, विकासकाला नोटीस देण्यांत येईल. तरी याबाबत कार्यवाही झाली कां ? त्याची प्रत मला देण्यांत आलेली नाही. भर रस्त्यात बोअरवेल खोदणे हे योग्य आहे कां ?

मा. सभापती :

सहा. संचालक नगर रचना अधिकारी स्वतः शनिवार, रविवारी तुमच्या प्रभागात येऊन प्रत्यक्ष पाहणी करतील. आचारसंहितेमुळे त्यांनी पाहणी केलेली नाही.

सौ. कविता पाटील :

किती वेळा पाहणी करणार. स्वतः आयुक्त साहेबांनी सुध्दा पाहणी केलेली आहे. पुन्हा तुम्ही पाहणी करुन कांय करणार ?

मा. सहाय्यक संचालक नगर रचना :

सभापती महोदय, मला पाहणी करावी लागेल व त्यांचे म्हणणे काय आहे हे ऐकावे लागेल. मला आयुक्त साहेबांनी त्या अनुषंगाने काही सुचना दिलेल्या नाहीत. सभापती महोदय, विकासकाबरोबर मिटींग घ्यायची ते आचारसंहितेमुळे शक्य झाले नाही. कंपाऊंड वॉलचे कामाबाबत तेथे साफसफाईचे काम सुरु झालेले आहे.

सौ. कविता पाटील :

तुम्ही याआधी मला पत्र देऊन सांगितले होते की, २००३ चा नियम आहे त्या नियमामध्ये बसत नाही. आणि आता तुम्ही सांगता की, साफसफाईला सुरुवात केलेली आहे. आता मी ते पत्र आणलेले नाही.

मा. सहाय्यक संचालक नगर रचना :

मा. सभापती महोदय, मी सन्मा. सदस्या यांच्याबरोबर शनिवारी पाहणी करतो व पुढील स्थायी समिती सभेच्या आंत निर्णय घेतो.

श्री. हणमंत जगदाळे :

सभापती महोदय, मागील सभा ज्या कारणासाठी तहकुब झाली त्यामध्ये ठाणे शहरामध्ये दोन दुर्घटना घडल्या त्याबाबतची चर्चा आजच्या सभेमध्ये करण्याचे ठरले आहे. तसेच तिसरी दुर्घटना काल परिवहन सेवेच्या बसची घडली. तरी प्रथम अग्निशमन विभागाचे अधिकारी यांनी नंतर रेल्वेचा खुलासा व्हावा नंतर परिवहन सेवेच्या अधिका-यांनी खुलासा करावा.

मा. मुख्य अग्निशमन अधिकारी :

सभापती महोदय, दि. १७ ऑक्टोंबर ०९ रोजी वागळे इस्टेट अग्निशमन दलाकडे रात्रौ ११.४८ मिनिटांनी तारांगण येथील पुनर्वसन इमारतीला आग लागल्याची वर्दी आली. त्यानंतर त्वरीत वागळे व बाळकुम अग्निशमन गाडी सदर दुर्घटनास्थळी गेली. साधारण रात्री १.०५ वा. ती आग विझली होती. तपासाअंती असे लक्षात आले की, बहुतेक फटाक्यामुळे ती आग लागली असावी. गॅलरीमध्ये वेस्ट मटेरिअल होते, प्लॅस्टीक होते, लोखंडी कपाट होते त्याला आवरण होते सदरची आग विझवुन , तपास करुन सर्व अग्निशमन अधिकारी परत आले. नंतर पुन्हा तीन -साडे तीन तासांनी पुन्हा पहाटे ४.३० वा. पुन्हा त्याच मजल्यावर त्या फलॅटला आग लागल्याची वर्दी आली. त्यानंतर वागळे , बाळकुम अग्निशमन दलाची गाडी मी पाठवुन त्यांच्याबरोबर टँकर पाठवुन आग विझविण्याचा प्रयत्न केला. आपले वागळे अग्निशमन विभागाचे सहा कर्मचारी लिफट मध्ये गेले आणि दुसरी टीम जीन्याने जाऊन आग विझवत होते. तेथे गेल्यानंतर लक्षात आले की, संपूर्ण काळोख पसरलेला होता आणि लोकांचा आरडाओरड चालू होता. तसेच दुस-या इमारतीमधील गच्चीमधुन देखिल बचावाचे तसेच आग विझविण्याचे प्रयत्न चालू होते. सदरहू घटनास्थळी तीन फायरइंजिन व दोन टँकर होते ती सिस्टीम वापरुन आपण आग विझविली आहे. आग विझविण्याच्या अंतिम टप्प्यात असताना लक्षात आले की, लिफट मध्ये कोणीतरी अडकले आहे त्यानंतर आपल्या अग्निशमन कर्मच-यांना लिफट मधून बाहेर काढले त्यानंतर त्यांना सिव्हील हॉस्पिटल व कळवा हॉस्पिटलला नेण्यांत आले. या दुर्दैवी घटनेत आपले सहा कर्मचारी दगावले गेले.

श्री. नजीब मुल्ला :

सभापती महोदय, जे फायरमन आपले लिफटमध्ये गेले व अचानक लिफट बंद पडली. तरी त्या लिफटचा विद्युत सप्लाय बंद करण्याचा आदेश नक्की कोणी दिला ? याची माहिती आपण घेतली आहे का?

मा. मुख्य अग्निशमन अधिकारी :

सभापती महोदय, आयुक्त महोदयांनी आपले नगर अभियंता यांचेमार्फत चौकशी नेमली आहे. शासनामार्फत देखिल आपण चौकशी करणार आहोत. पोलिस केस सुध्दा चालू आहे. दरम्यानच्या काळात लिफट इन्स्पेक्टर आणि इलेक्ट्रिक इन्स्पेक्टर यांना आपण आगीचे कारण व ही लिफट कां बंद पडली याबाबत आपण त्यांना विचारणा केलेली आहे.

श्री. राजन किणे :

सभापती महोदय, प्रथम रात्री जी आग लागली ती आग पूर्णपणे विझली नसल्याकारणाने ती पुन्हा सकाळी लागली असावी असे वाटते. त्यामुळे प्रथम लागलेली आग पूर्णपणे विझली होती की नाही याची सुध्दा चौकशी होणे गरजेचे आहे.

मा. मुख्य अग्निशमन अधिकारी :

प्रथम जी आग लागली होती ती विझली आहे की नाही याची खात्री करुन घेतली होती. तेथील जे घरमालक कुळकर्णी म्हणून दाम्पत्य होते त्यांना दाखविले होते. त्याठिकाणी थोडे-थोडे पाणी मारले होते त्यामुळे या परीस्थितीत तुम्ही राहू नका असे त्यांना सांगितले. इलेक्ट्रिक इन्स्पेक्टरकडून नक्की आगीचे कारण आपल्याला समजू शकेल.

श्री. हणमंत जगदाळे :

सभापती महोदय, याबाबत संबंधित अधिका-यांकडून आत्त्ताच खुलासा करण्यांत आलेला आहे. आग कशाप्रकारे लागली व त्यांनी कांय-कांय केले याचा खुलासा केला. परंतु वास्तविक पाहता, असा प्रकार घडल्यानंतर कांय करायला पाहीजे आणि कांय केल गेलं ,यामध्ये कोणती तफावत राहीली ? कशामुळे ही दुर्घटना घडली व दुर्घटनेमध्ये आपले सहा फायरमन मृत्युमुखी पडले. हृदय हेलावणारी ही घटना होती. ही घटना घडत असताना ज्या प्राथमिक गोष्टीची काळजी घ्यायला हवी ,ती घेतली होती की नाही हा पहीला प्रश्न आहे. तसेच तेथे जो अधिकारी नेमला होता तो कोण होता ? माझ्या माहितीप्रमाणे तो कळवा रुग्णालयात ॲडमिट होता त्याची आजची परीस्थिती कांय आहे ? त्यांच्याकडून कोणते स्टेटमेंट घेतले आहे कां ? आपण सांगितले की, यासंदर्भात सखोल चौकशी चालू आहे. घटना घडली त्याबाबत चौकशी होईलच. परंतु भविष्यात अशाप्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून कांही गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. शहरातील नागरीकांची सुरक्षा हा देखिल आपल्यादृष्टीने अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. त्यादृष्टीने कोणत्या खबरदारी घ्यायला पाहीजे होत्या आणि कोणत्या घेतल्या नाही हा देखिल महत्वाचा मुद्दा आहे. आणि ही चौकशी आपण नगर अभियंता यांच्यामार्फत होत आहे. वास्तविक पाहता अग्निशमन विभागाच्या बाबतीत कांही नॉर्म्स आहेत . अशाप्रकारची दुर्घटना घडल्यानंतर आपल्या कर्मचा-यांनी हया-हयाप्रकारे काम करणे आवश्यक आहे असे नॉर्म्स आहेत. नगर अभियंता यांचेकडून जर अहवाल येणार असेलतर आम्ही निश्चित त्याचे स्वागत करु. परंतु त्या अहवालावर निश्चितपणे या सभागृहात चर्चा होणे गरजेचे आहे. आणि तो अहवाल कधी येणार ? त्याचा अवधी किती दिलेला आहे ?

मा. अतिरीक्त आयुक्त, श्री. गुप्ता साहेब :

मा. सभापती महोदय, या दुर्घटनेसंदर्भात प्राथमिक आणि तांत्रिक चौकशी करण्याकरीता नगर अभियंता आणि उपआयुक्त (आपत्कालीन व्यवस्थापन ) या दोघांची मा. आयुक्त साहेब यांनी नेमणुक केलेली आहे. आणि त्यांना लवकरात लवकर अहवाल सादर करण्यासंदर्भात निर्देश दिलेले आहेत. तसेच मुख्य अग्निशमन अधिकारी यांना सदर दुर्घटनेबाबतची चौकशी करण्याकरीता तसेच वाहन निरीक्षक व विद्युत अभियंता यांचा अहवाल घेण्याबाबत सुचना देण्यांत आलेली आहे. तसेच उपआयुक्त - आपत्कालीन आणि उप नगर अभियंता (विद्युत ) हे सुध्दा यासंदर्भात अहवाल देणार आहेत. ही सर्व चौकशी तांतडीने करण्याबाबत मा. आयुक्त यांनी संबंधित अधिका-यांना निर्देश दिलेले आहेत. मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी जी चौकशी केली आहे ती पूर्ण केली आहे किंवा कसे यासंदर्भात ते अहवाल देतील. नगर अभियंता आणि उपआयुक्त यांचा अहवाल येणे बाकी आहे. ते लवकरात लवकर घेणेबाबत कार्यवाही करण्यांत येईल.

श्री. हणमंत जगदाळे :

सभापती महोदय, माझा मुद्दा असा आहे की, त्यांना अवधी देणे गरजेचे आहे. यासंदर्भातील अहवाल निश्चित कधी येणार याचा कालावधी ठरविणेबाबत सभापती महोदय आपण आदेश द्यावेत. एक महिन्यात सभागृहाला अहवाल सादर करण्यांत यावा, अहवाल आल्यानंतर चर्चा करु.

श्री. नजीब मुल्ला :

सभापती महोदय, प्रशासनामार्फत एक सदस्य समिती नियुक्त केली त्याची वेळ मर्यादा नाही. आपण या समितीवर यासंबंधातील तांत्रिकदृष्टया सक्षम माणुस नेमला असता जसे निवृत्त मुख्य अग्निशमन अधिकारी यांची जर या समितीवर नेमणूक करण्यांत आली असती तर त्यांचा या क्षेत्रातील

अनुभवाचा आपल्याला विचार करणे जास्त सोईस्कर झाले असते. नगर अभियंता सक्षम आहेत परंतु नगर अभियंता हे अग्निशमन विभागातील टेक्निकल व्यक्ती नाहीत. त्यामुळे ही केलेली समिती चुकीची आहे असे माझे म्हणणे आहे. नागरीकांपुढे जर सत्य परीस्थिती आणायची असेलतर या समितीवर निवृत्त मुख्य अग्निशमन अधिकारी याची नेमणूक व्हावी अशी माझी शिफारस आहे, म्हणजे आपल्याला अहवाल चांगल्याप्रकारे प्राप्त होईल.

तसेच आतापर्यंत आपले फायरमन कोणत्या ट्रेनिंग कार्यक्रमाला गेले आहेत कां ? कारण दिवसेंदिवस ठाणे महापालिकेच्या हद्दीत इमारतींची उंची वाढत आहे.

श्री. दिलीप बारटक्के :

सभापती महोदय, ठाणे शहर अग्निशमन विभागाच्या इतिहासामध्ये गंभीर अशी घटना आहे, याबाबत चर्चा चालू आहे. जे जवान शहीद झाले त्यांना आपण आर्थिक मदत दिली. परंतु तेवढयापर्यंत न थांबता तज्ञ व्यक्तीकडून सखोल चौकशी व्हावी, या मताशी आम्ही सहमत आहोत. त्याचप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात इतर जे अग्निशमन केंद्र आहेत त्यामध्ये वाढ झाली पाहीजे. अशी दुर्दैवी घटना पुन्हा घडू नये या दृष्टीकोनातून सुध्दा उपाययोजना व्हावी. तसेच अग्निशमन विभागातील ज्या त्रुटी आहेत त्या दूर व्हाव्यात.

मा. सभापती :

सभागृहामध्ये जेष्ठ सदस्य श्री. जगदाळे साहेब तसेच बारटक्के , नजीब मुल्ला यांनी अग्निशमन विभागाच्या दुर्घटनेबाबत चर्चा केली. या चर्चेच्या अनुषंगाने या घटनेचे गांभिर्य लक्षात घेता ३० दिवसामध्ये याची प्रक्रिया पूर्ण करण्यांत यावी, आणि हा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यांत यावा. नगर अभियंता हे तांत्रिक बाब सांभाळू शकतात. आयुक्तांनी एक समितीचा निर्णय घेतलेला आहे. ज्यावेळी या समितीचा निर्णय सभागृहासमोर येईल त्यावेळी त्रुटी लक्षात आल्यानंतर दुसरी कोणती समिति नियुक्त करणे आवश्यक आहे की नाही याबाबत त्यावेळी सभागृह निश्चित निर्णय घेईल.तरी समिती नेमल्यापासून ३० दिवसाचे कालावधीत याबाबतचा अहवाल सभागृहासमोर यावा.

श्री. हणमंत जगदाळे :

सभापती महोदय, रेल्वेच्या अपघाताबाबत तसेच परिवहनच्या बसची जी दुर्घटना झाली त्याबाबत देखिल खुलासा व्हावा.

मा. सभापती :

रेल्वे दुर्घटनेबाबत शासनाकडून चौकशी करण्यांत येत आहे. तरी यासंबंधात माहिती देण्यासाठी आपले संबंधित अधिकारी आज उपस्थित नाहीत. पुढील सभेत ते आल्यानंतर याबाबत चर्चा करण्यांत येईल.

श्री. नजीब मुल्ला :

सभापती महोदय, आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, २४ बसेस रस्त्यावर काढण्यांत आलेल्या आहेत. अचानक कशा काढण्यांत आल्या ? याआधी ही छोटी-मोठी कामे करुन हया बसेस दुरुस्त कां करण्यांत आल्या नाहीत ? परिवहन सेवेची नक्की कांय परीस्थिती आहे ? तेथील कर्मचा-यांच्या ब-याच तक्रारी आहेत सदर अपघाताबाबत आधी सांगण्यांत आले की, चालकाचे नियंत्रण सुटले परंतु चालक म्हणतो नियंत्रण करण्यासाठी बसमध्ये सुविधाच नाहीत. हॉर्न वाजविण्यासाठी भोंगे नाहीत अशी परीस्थिती आहे. तरी याबाबत खुलासा व्हावा.

मा. श्री. सरमोकदम, परिवहन व्यवस्थापक :

सभापती महोदय, परिवहन सेवेच्या बसचे आर्युमान ११ वर्षे ५ महीने एवढे आहे. आपण जे म्हणता त्या परिवहन सेवेच्या बसचा अपघात झाला ती गाडी नविन होती. अपघाताचे कारण म्हणजे मोठे पोल घेऊन जाणारा ट्रक त्याच्या केबिनच्या बाहेर पोलची लांबी साडे तीन ते चार फुट बाहेर होती. मेन रस्त्यावर येताना फक्त पोल दिसले रात्री१२.३० ते १२.४५ ची वेळ होती. तो पोल समोरच्या काचेवर लागला त्यानंतर ड्रायव्हरला लागले व ड्रायव्हर स्टेअरींगवरच अर्धबेशुध्दीत पडला त्यामुळे गाडीवरचा ताबा सुटला व गाडी उजव्या बाजुला वळली. आणि तेथे एक रिक्षाचालक ऑन द स्पॉट गेला.

परिवहन सेवेकडील एकूण कामकाज पाहता, २८ सिरीजच्या गाडया हया नविन आहेत. व नविन गाडयाच मोठया प्रमाणावर नादुरुस्त आहेत. तसेच तेथे पदधत होती की, मटेरीयल मिळत नाही म्हणून एका गाडीचे पार्टस् चार गाडयांमध्ये विभागणे. यामुळे नविन सिरीअलच्या गाडया मोठया प्रमाणावर नादुरुस्त आहेत. आणि जास्तीत जास्त इंजिनची कामे आहेत. एक इंजिन बाहेरुन दुरुस्त करुन आणले तरी ते बसवायला दीड ते दोन दिवस लागतात. एकूण परिवहनची मानसिकता अशी आहे की, कांही झाले की, पैशासाठी इकडे यायचे , पैसे मिळाले की पुन्हा ‘ ये रे माझ्या मागल्या.’ त्यामुळे जेवढी रक्कम पगारासाठी आवश्यक आहे तेवढी देखिल रक्कम परिवहनमध्ये जमा होत नाही. ॲव्हरेज उत्पन्न काढले तर ११.५ लाख व रोजचा खर्च १७ लाख. २३ कोटी ९५ लाख मागणी देणी आहेत. याला पर्याय तीन आहेत. नविन सिरीजच्या ज्या नादुरुस्त गाडया आहेत त्या एक- एक करुन दुरुस्त करणे. आपण म्हणता त्याप्रमाणे एकदम २४ गाडया रस्त्यावर आलेल्या नाहीत. मोठया प्रमाणात स्पेअर पार्टची बीले ठेवल्यामुळे कोणीही मटेरियल क्रेडीट वर दयायला तयार नाही. आता मार्केट मध्ये मंदी असल्यामुळे डीलरने ॲडव्हान्स पेमेंट दिल्याशिवाय कंपनी स्पेअर पार्टस् देत नाही. त्यामुळे त्याने आपल्याला स्पेअर पार्टस् ऑन पेमेंट देणे हाही प्रश्न आता निकाली निघालेला आहे. महापालिकेकडून जे २ कोटी ४० लाख बोनससाठी मिळाले त्यातील सुमारे २२ लाख शिल्लक राहीले. त्या शिल्लक रक्कमेतून २२ गाडया दुरुस्त कराव्यात असे ठरले. त्यासाठी खाजगी एक्स्पर्टकडून गाडया दुरुस्त करुन पाहील्या परंतु अडीच ते तीन दिवसाला ॲव्हरेज एक गाडी बाहेर पडते. दुर्दैवाने नविन गाडयांनाच बोअरींगचे पाणी वापरले गेले.

परवा जो अपघात झाला त्यानंतर रस्ते बंद झाले. भरपाई म्हणून आपण प्रायमरी स्टेजला २५ हजार देतो, ५ लाखाची डिमांड असेलतर ते देखिल कोर्ट ऑर्डर आल्यानंतर देतो. तसेच जी व्यक्ती मयत झाली आहे त्याचे १०-१२ महिन्यापूर्वीच लग्न झाले होते असे तेथील लोकांनी सांगितले. तात्काळ म्हणून त्याला ५० हजार रु. देऊ असे ठरले. परंतु तेथील मॉबचे म्हणणे व रिक्षा संघटनेने बंद पुकारला होता व त्यांनी सांगितले की, आतापर्यंत महापालिकेने अशा परीस्थितीत २ लाख दिलेले आहेत त्यामुळे २ लाखापेक्षा कमी देऊ नका. युनियनची मागणी १०-१५ लाख अशीच होती. नजीकच्या काळात सुध्दा २ लाख दिले. म्हणून २ लाख ही रक्कम भरपाई म्हणून काल नक्की करण्यांत आली. तसेच त्याची बायको दहा महिन्यात विधवा झाली म्हणून तीला नोकरी लावा अशी संघटनेतर्फे मागणी करण्यांत आली. त्यामुळे सफाई कामगार पद नसलेतरी झालेली दुर्घटना लक्षात घेऊन ते मान्य केले. बंदच्या काळात ७-८ तास आपल्या बसेस डेपोच्या बाहेर जाण्यास त्यांनी मज्जाव केला होता. नंतर त्यांनी बंद मागे घेतला व आपल्या बसेस सुरळीत चालू झाल्या.

श्री. नजीब मुल्ला :

सभापती महोदय, आता ज्या परिवहनच्या बाबतीत अहवाल व्यवस्थापकांनी सादर केला. नवीन गाडयांमध्ये किरकोळ कामे निघाली आपण हे समजू शकतो. परंतु इंजिन म्हणजे त्याची वॉरंटी असते. वॉरंटी नंतर सुध्दा एक कालमर्यादा असते.

मा. श्री. सरमोकदम, परिवहन व्यवस्थापक :

नविन गाडया म्हणजे कोणत्या गाडया त्या मी तुम्हाला सांगतो. जेंव्हा मी म्हणतो परिवहनच्या ॲव्हरेज गाडयांचे वय ११ वर्षे ५ महिने. म्हणजे त्यातील ३० टक्के गाडया हया १५-१६ वर्षापूर्वीच्या आहेत. हया नविन गाडया म्हणजे २००४ ते ०५ च्या दरम्यानच्या गाडया आहेत. म्हणजे ज्यांचे आयुष्य ५ ते ६ वर्षे असे आहे. म्हणजे माझ्या दृष्टीने त्या भागातील नविन गाडया.

श्री. नजीब मुल्ला :

सभापती महोदय, परिवहन ही आपल्या सर्वसामान्य नागरीकांना सुविधा पुरविणारी व्यवस्था असुन, याबाबत आराखडा तयार करणे आवश्यक आहे.ठाणे शहराची ही लाईफ लाईन आहे. असे असताना परिवहन सेवेची आजची आर्थिक परीस्थिती व्यवस्थापकांनी सांगितले त्यावरुन तरी असे दिसते की, चांगली नाही. आपण कर्मचा-यांना बोनस दिला त्यातील जे २२ लाख रु. शिल्लक राहीले त्यातुन ते दुरुस्त करीत आहेत. याचाच अर्थ आपण जे त्यांना पैसे देतो त्याचे व्यवस्थापन करण्यात ते कमी पडत आहेत. तसेच जेएनएनयुआरएम मार्फत तसेच अन्य योजनेमार्फत ज्या नविन बसेस आपण घेत आहोत त्याची पूर्तता करण्यांत आपण कमी पडलो आहोत.बसेसची जी वाढती मागणी आहे ती आपण पूर्ण करु शकत नाही. तसेच स्पेअर पार्टस्च्या बाबतीत कोठेतरी परिवहन सेवेचे व्यवस्थापन हे चुकलेले आहे , हे आपण मान्य करणे आवश्यक आहे. स्टोअर वर आपले नियंत्रण राहीलेले नाही. स्टोअर मध्ये आलेला माल किती चांगला आहे व किती निकृष्ट आहे याबाबतीत आपण लक्ष घातलेले नाही. परिवहनची बस ज्यावेळी दुरुस्तीसाठी जाते त्यावेळी त्या पार्टचे किती वेळा बील निघते हे न पाहील्यामुळे आर्थिक टंचाईला सामोरे जावे लागत आहे. तेथील कामकाजा बाबतीत चांगल्याप्रकारे लक्ष घातले असते, आणि पैसे व्यवस्थित वापरले असते तर आज ही परीस्थिती आली नसती. आज बी.एस.टी. सारखी संस्था नवनविन योजना आणून चांगल्याप्रकारे काम करीत आहेत. मी मान्य करतो की, कोणतीही परिवहन सेवा फायदयामध्ये नाही. परंतु तुम्ही आमच्यासमोर नवनवीन प्रस्ताव आणा, आपण त्याबाबत चर्चा करु. यापूर्वी एक प्रस्ताव आमच्यासमोर आला होता की, एक प्राधिकरण स्थापन करावे त्याबाबतीत आपला अहवाल कांय आहे ? त्यामुळे आपल्याला किती फायदा व तोटा आहे , याबाबत सुध्दा सभेसमोर अहवाल यायला हवा. नागरीकांना चांगली सुविधा मिळत असेल व आर्थिक खर्च देखिल जास्त नसेलतर तो अहवाल आपल्याकडून आल्यानंतरच आम्ही विचार करु शकतो.

मा. श्री. सरमोकदम, परिवहन व्यवस्थापक :

सभापती महोदय, ज्याप्रमाणे पुण्याचे प्राधिकरण जसे झाले तसे शासकीय स्तरावर हा विचार चालू आहे. प्राधिकरण होईल तेंव्हा होईल. आता तांतडीने आपण करु शकणा-या बाबी म्हणजे, जेएनएनयुआरएम मधून ज्या बसेस येणार त्या आपल्या १०-१५ वर्षाच्या बसेसना रिप्लेस करणार एवढी मोठी रिप्लेसमेंट कोणालाच मिळत नाही पण सुदैवाने ती आपल्याला मिळत आहे. नविन टेक्नॉलॉजीच्या गाडया येणार आहेत त्याआधी कामगारांची मानसिकता सुधारणे जास्त महत्वाचे आहे. २२६ गाडयांचा स्टाफ परंतु मी रोज १२० गाडया चालवितो. पगार २६० लोकांचा देण्यांत येतो. त्या गाडयाही फेरा पूर्ण करीत नाहीत. दुरुस्त केलेली गाडी पुन्हा आठ दिवसांनी आंत येते. हे इंटर्नल मॅटर फार महत्वाचे आहेत , नविन बसेस यायच्या आधी त्यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. या महिन्याचा लॉस म्हणजे, टोटल पेमेंट २ कोटी ५६ लाख आणि एकूण पगारासाठी कमी पडत असलेली रक्कम१ कोटी ३१ लाख रुपये परिवहन व्यवस्थापक म्हणून मी या रक्कमेचे समाधान देऊ शकत नाही.जर २०-२२

टक्क्याचा लॉस असता तर मी सांगितले असते की, दर महिन्याला तुम्ही मला २२% ,२२३ गाडया पूर्णपणे रस्त्यावर येईपर्यंत द्या नंतर मी ते जस-जशी रक्कम येईल तशी देईन. परंतु आता सुधारणेला जास्त प्राधान्य देणे हे महत्वाचे आहे.

श्री. नजीब मुल्ला :

सभापती महोदय, आता परिवहन व्यवस्थापकांनी चांगल्याप्रकारे खुलासा केला आहे. जेएनएनयुआरएम च्या गाडया कधी येणार याबाबतीत खुलासा व्हावा. तसेच आपल्या वाहनचालकांना त्या गाडया चालविता येतील कां ? आपण म्हणता त्याप्रमाणे कर्मचा-यांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. नागरीकांना सुविधा देण्यामध्ये परिवहन सेवा कमी पडत आहे याचा अर्थ आपण प्लॅनिंग मध्ये कमी पडत आहोत. कर्मचा-यांकडून काम करुन घेण्यामध्ये कमी पडत आहोत. याबाबत समितीमध्ये चर्चा होऊन त्यांना मार्ग देणे आवश्यक आहे. परिवहनचे कामकाज अजुनही आपण चांगल्यारीतीने करु शकतो. परंतु जर आपण गांभिर्यने लक्ष दिले नाही व चर्चा करुन निर्णय घेतला नाहीतर भविष्यात परिवहनचे काम चांगल्यारीतीने चालू शकेल हे सांगु शकत नाही. कारण एक अधिकारी किती करणार ? आम्हाला सुध्दा त्यांना पाठींबा देऊन त्यांना मदत करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आपण जर आदेश दिले तर परिवहन सेवा आपण सुधरु शकतो.

मा. सभापती :

जेएनएनयुआरएम च्या ८० बसेस ३१ ऑक्टोंबर पर्यंत येणे आवश्यक होते परंतु तो पुरवठा करु शकलेला नाही. टेंडरमध्ये ज्या अटी टाकण्यांत आल्या होत्या त्याप्रमाणे दंडात्मक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे. परिवहनची स्वतंत्र कमिटी आहे. परंतु त्यांना मदत करण्याच्या दृष्टीने मा. महासभेच्या मार्फत आपण एक धोरणात्मक निर्णय घेणार आहोत व सर्व पक्षीयांच्या वतीने याबाबत एक समन्वय समिती नेमणार आहोत. जेणेकरुन तेथील त्रुटी महासभेसमोर सुध्दा येतील. तरी याबाबत लवकरच निर्णय होईल.

श्री. राजन किणे :

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील डॉ. दिपक पवार यांना निलंबित केले आहे. तरी त्यांना निलंबित कां करण्यांत आले आहे याबाबत खुलासा व्हावा.

डॉ. केंद्रे, वैद्यकिय आरोग्याधिकारी :

सभापती महोदय, डॉ. दिपक पवार हे आधिव्याख्याता सर्जरी युनिट मध्ये कार्यरत होते. त्यांना २४ तास डयुटी असते. त्यांना कॉल केल्यानंतर तात्काळ हजर राहणे आवश्यक असते. २९.१०.०९ रोजी ते डयुटीवर होते त्यादिवशी एकूण अपघातात सापडलेले चार रुग्ण कळवा हॉस्पिटलला रात्री १.३० वा. आणण्यांत आले. रात्री १.३० वाजलेपासून स. ६.०० वाजेपर्यंत त्यांना वारंवार संपर्क करुनही ते कर्तव्यावर आले नाही रुग्ण तपासले नाही. त्यांनी कर्तव्यात निष्काळजीपणा केला हे प्रथमदर्शनी आढळून आले म्हणून त्यांना निलंबित केलेले आहे.

श्री. राजन किणे :

सभापती महोदय, ज्यावेळी मार्ड च्या डॉक्टरांचा संप होता त्या कालावधीमध्ये हयाच डॉक्टरांनी एका दिवसामध्ये रुग्णांवर १६ शस्त्रक्रिया केल्या. दि. २९.१०.२००९ रोजी त्यांची कांही तरी तांत्रिक अडचण असेल म्हणून ते येऊ शकले नसतील किंवा दुरध्वनीवर उपलब्ध होऊ शकले नसतील. परंतु मार्ड

च्या संपाच्या कालावधीत त्यांनी जे कांही काम केले ते काम बघुन त्यांच्या बाबतीत सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेऊन त्यांच्या निलंबनाची कारवाई मागे घेणेबाबत विचार होणे गरजेचे आहे.

मा. महापालिका सचिव विषयपत्रिकेस सुरुवात करुन प्रकरण क्र. १००७ वाचून दाखवितात.

प्रकरण क्र. १००७ - मंजूर

मा. सचिव प्रकरण क्र. १००८ वाचून दाखवितात.

श्री. नजीब मुल्ला :

सभापती महोदय, आपण ही जी पावडर खरेदी करीत आहोत ४०० गोण्या म्हणजे २५ किलोची एक बॅग. ही पावडर वापरण्याचे नियम कांय आहेत ? नगरसेवकांनी तक्रार केल्यानंतर टाकायचे की, स्वच्छता निरीक्षक यांनी रोज कचरा उचलल्यानंतर टाकायचे ?.

मा. उपआयुक्त ( घनकचरा व्यवस्थापन ), श्री.बालाजी खतगांवकर :

मा. सभापती महोदय, आपल्या शहरासाठी डंपिंगची मोठी अडचण आहे. तसेच एक सी.पी. ट्रान्सफर स्टेशन आहे त्याठिकाणी दुर्गंधी होऊ नये म्हणून मुख्यत्वे या पावडरचा वापर केला जातो. सन्मा. सदस्यांनी नमुद केले त्याप्रमाणे सुध्दा शहरामध्ये जी दैनंदिन कचरा साफसफाई केली जाते , कचरा साफ केल्यानंतर निर्जंतुकीकरण करण्यासाठी सुध्दा याचा वापर करणे अपेक्षित आहे.

श्री. नजीब मुल्ला :

आपण आता सांगितले की, डंपिंग ग्राऊंडची अडचण आहे. मागे आपण हँजर बायोटेकला दिले होते त्याचे कांय झाले ?

मा. उपआयुक्त ( घनकचरा व्यवस्थापन ), श्री.बालाजी खतगांवकर :

खाजगीकरणाच्या माध्यमातुन कच-याची विल्हेवाट लावणेसाठी आपल्या महापालिकेने डायघर याठिकाणी बीओटी तत्वावर जो प्रकल्प प्रक्रिया करण्यासाठी उभारण्यात येत आहे त्यासाठी त्यांना आदेश दिलेले आहेत.डायघरची जागा राज्य शासनाने आपल्या ताब्यात दिलेली आहे. पोलिस बंदोबस्ताअभावी तो प्रकल्प सद्या बंद आहे. परंतु नुकतेच पोलिस आयुक्त साहेबांनी आपल्या मा. आयुक्तांना व आम्हाला निरोप देऊन या आठवडयात बंदोबस्त देण्याचे मान्य केले आहे. तरी हँजो बायोटेक यांचेशी चर्चा करुन पुर्नप्रकल्पाचे बांधकाम करण्यासंबंधी कार्यवाही करण्यांत येत आहे.

श्री. नजीब मुल्ला :

आपण ९९ कोटीचा जेएनएनयुआरएम अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागाला मजबुतीकरण करण्यासाठी मा. महासभेने प्रस्ताव मंजूर केला होता. त्याचे पुढे कांय झाले?

मा. उपआयुक्त ( घनकचरा व्यवस्थापन ), श्री.बालाजी खतगांवकर :

९९ कोटीचा प्रस्ताव जो आपण तयार केलेला आहे , तो आपण एमएमआरडीए ला सादर केला होता त्यामध्ये पुर्नदुरुस्ती होउन तो ७८ कोटीचा अंतिम प्रस्ताव केला आहे आणि तो केंद्र शासनाला सादर केला आहे.

श्री. नजीब मुल्ला :

सभापती महोदय, आमच्या विभागात कचरा उचलण्यासाठी गाडी नाही, फावडे नाही, गटारे साफ करण्यासाठी सामुग्री नाही. एक वर्ष झाले मी गाडया वेल्डींग करुन देत आहे. नविन गाडया नाहीत, स्वच्छता नाही. अनुपस्थित असलेले कर्मचारी आणि उपस्थित असुनदेखिल अनुपस्थितीत कर्मचारी मस्टरवर सहया करतात परंतु कामावर येत नाहीत अशी परीस्थिती आहे. आमच्या चार प्रभागात ८० कर्मचा-यांपैकी फक्त ४० कर्मचारी हजर आहेत. एकूण गटाराची लांबी २० कि. मी. आहे. ती आम्ही स्वच्छता निरीक्षक यांच्याकडून मोजून घेतली आहे. कळवा ते साकेत मुख्य रस्ताही साफ करणेचा आहे. प्रभागातील आंतील आणि मुख्य रस्ता असे ४० लोक कसे साफसफाई करणार ? मी याबाबतीत सांगुन सांगुन थकलो परंतु आम्हाला जादा कर्मचारी देण्यांत येत नाहीत तसेच अनुपस्थितीत कर्मचा-यांच्या बाबतीत कारवाई होत नाही.

मा. उपआयुक्त ( घनकचरा व्यवस्थापन ), श्री.बालाजी खतगांवकर :

सफाई कर्मचा-यांची नोंदी बायोमेट्रीक पध्दतीने होण्याबाबत मा. आयुक्तांचे धोरण आहे. उपस्थिती नियंत्रण आहे ते संगणकीकरण पध्दतीने करण्याचे काम क रणार आहोत. आणि जे साहित्य आम्ही स्वतः पाहून उपलब्ध करुन दिले जाईल.

श्री. नजीब मुल्ला :

संगणकात जो टायमिंगचा सेट आहे तो सेंट्रली द्या. याबाबतीत मला बँकेचा अनुभव आहे.

मा. सभापती :

सन्मा. सदस्य श्री. नजीब मुल्ला यांच्या अनुभवाचा प्रशासनाने उपयोग करुन घ्यावा.सुचना आहे की, आपला बँकेचा अनुभव पणास लावावा व प्रशासनाला मदत करावी. जेणेकरुन थम्ब इंप्रेशन व्यवस्थित होऊ शकेल.

श्री. दिलीप बारटक्के :

सभापती महोदय, आपल्या शहरामध्ये मलेरीया वगैरे तापाची साथ जोरात आहे. त्यासंदर्भात माहिती मिळावी.तसेच सन्मा. सदस्य श्री. नजीब मुल्ला यांनी हजेरी पेटीवर हजेरीबाबत प्रश्न मांडला , तो सर्व प्रभागात सारखाच आहे. तरी पुढील सभेला प्रत्येक हजेरी पेटीवर किती उपस्थिती आह, किती साहित्य मिळते याची माहिती मिळावी.

डॉ. केंदे, वैद्यकिय आरोग्याधिकारी :

सभापती महोदय, आता तापाची साथ कमी आहे.

प्रकरण क्र. १००८ - मंजूर

मा. महापालिका सचिव प्रकरण क्र.१००९ वाचून दाखवितात.

प्रकरण क्र. १००९ ते १०१३ - मंजूर

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०१६ दिनांक ४/११/२००९**

**ठ रा व :-**

आज दिनांक ४/११/२००९ रोजी होणा-या स्थायी समिती सभेसाठी सभागृहामध्ये आवश्यक असलेली गणपूर्तीसाठीचे सदस्य उपस्थित होते. तथापि मा.सभापती हे अनुपस्थित असल्याने आजच्या सभेसाठी जेष्ठ सन्मा.सदस्य श्री.पांडुरंग पाटील यांनी सभापतीपदी आसनस्थ व्हावे अशी सुचना सभागृहाच्यावतीने करण्यात आली.

सभास्थानी श्री.पांडुरंग पाटील हे आसनस्थ झाले.

सुचक :- श्री.दिलीप बारटक्के अनुमोदक :- श्री.नजीब मुल्ला

सर्वानुमते मंजूर

सही /- सौ.छाया मानकर
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्रमांक १००७ :- मा.स्थायी समितीच्या दिनाक ११/८/२००९ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०१७ दिनांक ४/११/२००९

ठ रा व :-

मा.स्थायी समितीच्या दिनांक ११/८/२००९ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त ही स्थायी समिती वाचुन कायम करीत आहे.

सुचक :- श्री.दिलीप बारटक्के अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर

सही /- पांडुरंग पाटील
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्रमांक १००८ :- मे.डॉल्फिन सेल्स कार्पोरेशन यांचेकडून मंजूर दराने मॅलेथिऑन खरेदी करणेस येणा-या वाढीव रुपये ७,७५,०००/- खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०१८ दिनांक ४/११/२००९

ठ रा व :-

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता,. घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत ठाणे शहराची दैनंदिन स्वच्छता केली जाते.

शहरामध्ये साफसफाई केल्यावर जागोजागी मॅलेथिऑन ५% पावडरची फवारणी करणे आवश्यक आहे.

सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील निविदा मा.स्थायी समिती ठराव क्र.३२३२ दि.२७.२.२००९ नुसार मे.डॉल्फिन सेल्स कार्पोरेशन यांची निविदा मंजुर आहे. त्यानुसार रु.३१/- प्रति किलो दर मंजुर असुन २५ किलो प्रति बॅगची एकुण किंमत रुपये ७७५/- आहे.

सबब, वरील प्रकरणास प्रशासनाने शिफारस केल्यापमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन शहरामध्ये रोगराई पसरु नये ही बाब विचारात घेऊन मे.डॉल्फिन सेल्स कार्पोरेशन यांचेकडून सन २००८-०९ चे मंजूर निविदा दर रुपये २५ किलो बॅगची किंमत रुपये ७७५/- असुन मंजूर दराने १००० बॅग्स खरेदी करणेस येण-या वाढीव रुपये ७,७५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सात लक्ष पंच्याहत्तर हजार मात्र) ही समिती मंजूरी देत असून खर्च "हत्यारे,अवलारे व जंतुनाशके " या लेखाशिर्षमधील तरतुदीमधुन करणेस ही स्थायी समिती मान्यता देत आहे.

सुचक :- श्री.दिलीप बारटक्के अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर

सही /- पांडुरंग पाटील
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्रमांक १००९ :- राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी भारतीय नियतकालिके खरेदी करणेबाबत.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०१९ दिनांक ४/११/२००९

ठ रा व :-

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता, राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी भारतीय नियतकालिके खरेदी करणेसाठीमुळ उत्पादक कंपनी एकच असल्यामुळे दरपत्रक मागवून प्रस्ताव तयार करण्यात येवून त्या प्रस्तावास मा.अति.आयुक्त सो यांनी दि.१/८/२००९ रोजी मान्यता दिली आहे.

सदर ग्रंथालयासाठी १२ भारतीय नियतकालिके मुळ उत्पादक कंपनी मे.मेडनो पब्लिकेशन आणि मिडिया लि.मुंबई यांचेकडून खरेदी करणेसाठी व त्यांची वार्षिक वर्गणी भरणेसाठी अंदाजे खर्च रु.२७,४००.०० अपेक्षीत आहे.

सबब, वरील प्रकरणास प्रशासनाने शिफारस केल्यापमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन सदरचा खर्च राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयाकडील पुस्तके खरेदी ०८००/८२७/२२४२०० या लेखाशिर्षकांतर्गत मंजूर तरतुदीमधुन रक्कम रु.२०,००,०००.०० मधुन करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५(२)(२) अन्वये मा.स्थायी समिती मान्यता देत आहे.

सुचक :- श्री.दिलीप बारटक्के अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर

सही /- पांडुरंग पाटील
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्रमांक १०१० :- प्रभाग क्रमांक ४१ चांदिवाला कॉम्प्लेक्स समोरील मैदानाच्या संरक्षक भिंतीची दुरुस्ती व इतर कामे करणेबाबतचे प्रकरण माहितीसाठी सादर.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०२० दिनांक ४/११/२००९

ठ रा व :-

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये खालील कामांना त्यास येणा-या अंदाजखर्चाच्या रक्कमेस तसेच सदर काम खाली दर्शविलेल्या ठेकेदाराकडून नमुद केलेल्या लेखाशिर्षकाखाली करुन घेण्यास मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात मान्यता दिलेली आहे.

| कामाचे नांव | अंदाजखर्च | लेखाशिर्षक | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| प्रभाग क्रमांक ४१ चांदिवाला कॉम्प्लेक्स समोरील मैदानाच्या संरक्षक भिंतीची दुरुस्ती व इतर कामे करणे. | रु.२,६१,१००/- | प्रभाग सुधारणा निधी ०९-१० | मे.नवजीवन म.का.सह.संस्था |

सबब, वरील प्रकरणास प्रशासनाने शिफारस केल्यापमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन सदरच्या केल्या गेलेल्या कार्यवाहीची या स्थायी समितीने, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती घेतली असुन, सदरचे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी पुन्हा प्रशासनाकडे पाठविण्यात यावे असे ही स्थायी समिती ठरवित आहे.

सुचक :- श्री.दिलीप बारटक्के अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर

सही /- पांडुरंग पाटील
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्रमांक १०११ :- प्रभाग क्रमांक ४१ सर्व्हीस रोड भंगारवाला चाळकडे जाणा-या रस्त्यालगत गटार / कल्व्हर्ट बांधणेबाबतचे प्रकरण माहितीसाठी सादर.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०२१दिनांक ४/११/२००९

ठ रा व :-

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये खालील कामांना त्यास येणा-या अंदाजखर्चाच्या रक्कमेस तसेच सदर काम खाली दर्शविलेल्या ठेकेदाराकडून नमुद केलेल्या लेखाशिर्षकाखाली करुन घेण्यास मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात मान्यता दिलेली आहे.

| कामाचे नांव | अंदाजखर्च | लेखाशिर्षक | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| प्रभाग क्रमांक ४१ सर्व्हीस रोड भंगारवाला चाळकडे जाणा-या रस्त्यालगत गटार / कल्व्हर्ट बांधणे. | रु.१,३०,०००/- | नगरसेवक निधी २००९-१० | मे.नवजीवन म.का.सह.संस्था |

सबब, वरील प्रकरणास प्रशासनाने शिफारस केल्यापमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन सदरच्या केल्या गेलेल्या कार्यवाहीची या स्थायी समितीने, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती घेतली असुन, सदरचे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी पुन्हा प्रशासनाकडे पाठविण्यात यावे असे ही स्थायी समिती ठरवित आहे.

सुचक :- श्री.दिलीप बारटक्के अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर

सही /- पांडुरंग पाटील
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्रमांक १०१२ :- प्रभाग क्रमांक ४४ मधील आंबेडकर रोड तलाव परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणेबाबतचे प्रकरण माहितीसाठी सादर.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०२२ दिनांक ४/११/२००९

ठ रा व :-

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये खालील कामांना त्यास येणा-या अंदाजखर्चाच्या रक्कमेस तसेच सदर काम खाली दर्शविलेल्या ठेकेदाराकडून नमुद केलेल्या लेखाशिर्षकाखाली करुन घेण्यास मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात मान्यता दिलेली आहे.

| कामाचे नांव | अंदाजखर्च | लेखाशिर्षक | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| प्रभाग क्रमांक ४४ मधील आंबेडकर रोड तलाव परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.६,६९,५००/- | मागासवर्गीय निधी | मे.एल.के.देवळे आणि कंपनी |

सबब, वरील प्रकरणास प्रशासनाने शिफारस केल्यापमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन सदरच्या केल्या गेलेल्या कार्यवाहीची या स्थायी समितीने, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती घेतली असुन, सदरचे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी पुन्हा प्रशासनाकडे पाठविण्यात यावे असे ही स्थायी समिती ठरवित आहे.

सुचक :- श्री.दिलीप बारटक्के अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर

सही /- पांडुरंग पाटील
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्रमांक १०१३ :- दिवा विभागामध्ये पावसाळयापूर्वी नाल्यांची साफसफाई करणेबाबतचे प्रकरण माहितीसाठी सादर.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १०२३ दिनांक ४/११/२००९

ठ रा व :-

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये खालील कामांना त्यास येणा-या अंदाजखर्चाच्या रक्कमेस तसेच सदर काम खाली दर्शविलेल्या ठेकेदाराकडून नमुद केलेल्या लेखाशिर्षकाखाली करुन घेण्यास मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात मान्यता दिलेली आहे.

| कामाचे नांव | अंदाजखर्च | लेखाशिर्षक | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| दिवा विभागामध्ये पावसाळयापूर्वी नाल्यांची साफसफाई करणे. | रु.९,११,७००/- | नाले सफाई | श्री.व्यंकटेश्वर भटकी जमात म.का.सह.संस्था |

सबब, वरील प्रकरणास प्रशासनाने शिफारस केल्यापमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन सदरच्या केल्या गेलेल्या कार्यवाहीची या स्थायी समितीने, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती घेतली असुन, सदरचे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी पुन्हा प्रशासनाकडे पाठविण्यात यावे असे ही स्थायी समिती ठरवित आहे.

सुचक :- श्री.दिलीप बारटक्के अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर

सही /- पांडुरंग पाटील
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

(तद्नंतर मा.सभापती स्थायी समिती दु.१.०० वाजता सभा संपल्याचे जाहीर करतात.)

**सभापती**
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**(सौ.छाया मानकर)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा संपल्याची वेळ - दु.१.००वा.
दिनांकः-४/११/२००९
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.